# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ २२६७ 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 22673915
Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915
**ई-मेल** - sec_mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in

**सहयोगी प्राध्यापक-सुघटनशल्यचिकित्साशास्त्र (Associate Professor in Plastic Surgery ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ**

**धारिका क्रमांक :८३७(२)(२२)/६२/दहा** **जाहिरात क्रमांक : ८५/२०१४**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील **सहयोगी प्राध्यापक- सुघटनशल्यचिकित्साशास्त्र (Associate Professor in Plastic Surgery ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** च्या ,**एका** पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अमागास |
|---|---|
| १ | १ |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सुचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** विचाराधीन पदाकरिता अपगांसाठी पद आरक्षित नसले तरी शासन निर्णय क्र. एसईएस /१२०२/(८१) वैसेवा-१, दि. १९ ऑगस्ट, २००५ नुसार. तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र/२००९/प्र. क्र.९/सुधार -३ दि.१३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने १) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (Blindness or Low Vision) असे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करु शकतात.

**३. वेतनश्रेणी :** : रु.३७,४००-६७,०००+ ग्रेड पे रु.९,०००/- व इतर भत्ते.

**४. पात्रता- उमेदवार भारतीय नागरिक असावा.**

**४.१** वय- **दिनांक १ जुलै, २०१४ रोजी अमागास वर्गवारीकरिता ३५ वर्षे व मागास वर्गवारीकरिता ४० वर्षा पेक्षा जास्त नसावे.**

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.३** शासन आदेशानुसार संबंधित आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.४** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. ( मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याची प्रमाणपत्रे क्रिडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत).

**४.५** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध् उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च् शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.६ शैक्षणिक अर्हता :-** M.S (Plastic Surgery) or M.Ch (Plastic & reconstructive surgery ) or M.Ch (Plastic Surgery)

**४.७ अनुभव :-** i) As Assistant Professor/Lecturer in Plastic Surgery for 2 years in a recognised medical college/institution.
ii) Minimum of two Research publications in indexed /national journals.

**४.८** In exceptional case where candidates with experience prescribed in para 4.7 above are not available the Government may on the recommendation of the Commission, make appointment to a post of Associate Professor on consideration of merits of the candidates and make a simultaneous reference to the Medical Council of India for relaxation of prescribed experience.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८ . शुल्क :**

**८.१ अमागास - रु. ४१५/- ८.२ मागासवर्गीय - रु. २१५/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत –**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १५ मार्च, २०१४ ते ४ एप्रिल, २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड

(५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

१०.६ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

१०.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर **'Unpaid'** असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२. चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१३. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१४. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१५.विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ४ एप्रिल, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्याpस भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ५ एप्रिल, २०१४ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..**

**ठिकाण :- मुंबई** **प्र.दा.अडसुळे**

**दिनांक :- १५ मार्च, २०१४** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**